# शब्द आणि संकल्पना

वैचारिक, समीक्षात्मक लेख

डॉ. सहदेव चौगुले-शिंदे (भेडसगावकर)
एम.ए., पीएच. डी; (इंग्लिश) एलएल.बी स्पेशल
माजी प्राचार्य, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B297

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**शब्द आणि संकल्पना : सहदेव चौगुले-शिंदे**

**© सौ. विजया सहदेव चौगुले-शिंदे**
'सालस' ११८२/१८३, प्लॉट नं. १५
८ वी गल्ली, राजारामपुरी पूर्व, कोल्हापूर.
मोबा. : ९८२३४३१२८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १७०/-

आमच्या कन्या
श्वेता, अस्मिता आणि चि. अनिकेत यांना
फुलासारखे जपणारे माझे सासरे
**स्व. कृष्णाजी पवार (धार)**
व सासूबाई
**स्व. कमलाताई कृष्णाजी पवार (धार)**
यांच्या पवित्र स्मृतीस...

## लेखकाची साहित्य संपदा

माजी प्रमुख व प्रपाठक इंग्रजी विभाग
माजी प्राचार्य नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अॅन्ड कॉमर्स, कोल्हापूर
पदव्युत्तर अधिव्याख्याता
संशोधन मार्गदर्शक
प्रकाशित साहित्य
लोन्लिनेस इन मॉडर्न अमेरिकन पोएट्री
प्रतिभेच्या पंखावर : जेफ्री चॉसर ते टेड ह्यूझ
शब्दसावल्या (कवितासंग्रह)
लोन्लिनेस इन इंग्लिश पोएट्री
पाथेय भाग - १ (चरित्र संग्रह)
पाथेय भाग - २ (चरित्र संग्रह)
पाथेय भाग - ३ (चरित्र संग्रह)
छंद अक्षरांचा (ललित लेख)
साहित्यिक यशवंतराव

# मनोगत

मला वाचनाचा छंद जडला तो भेडसगावच्या मराठी शाळेत. मराठी भाषेचं व्याकरण, गणित, भूमिती यांसारखे अवघड विषय मुख्याध्यापक ज्ञानदेव चौगुले, ज्ञानदेव फाळके गुरुजी, संत प्रवृत्तीचे हरी सावंत गुरुजी, केशव सावळा पाटील गुरुजी यांनी तेव्हा आमच्या मनावर असे काही बिंबवले की ते आजही ताजे आहेत. ज्ञानदेव फाळके गुरुजींनी तर काळी शाई आणि टाकाचा आग्रह धरला. त्यांनी तालुका पातळीवरच्या हस्ताक्षर स्पर्धेत भाग घ्यायला भाग पाडले आणि आम्हाला काही पारितोषिकेही मिळाली. शाळेतील तक्ते करण्याचे काम प्रामुख्याने माझ्याकडे असायचे. यामुळे अक्षर आणि शब्दांशी जवळचा, जिव्हाळ्याचा संबंध निर्माण झाला. भेडसगावच्या तेव्हाच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये कोडोलीचे एन.जे.पाटील व बेळगावचे जाधव सर यांनी विशेष लक्ष दिल्यामुळे पुढे शिकण्याची जिद्द निर्माण झाली.कोल्हापुरात विक्रम हायस्कूलच्या मराठीच्या सावंत मॅडम व इंग्रजीचे इंगळे सर यांच्यामुळे दोन्ही भाषांची आवड निर्माण झाली.

राजाराम महाविद्यालयात प्रा. श्रीनिवास दीक्षितांमुळे तर्कशास्त्र व तत्त्वज्ञानात रस वाटू लागला. प्रा. भगवंतराव देशमुख व प्रा. पा.ना. कुलकर्णी यांच्यामुळे मराठीकडे कल वाढला. प्रा. डॉ. बडेगकर यांच्यामुळे इंग्रजीसाठी जीव खुळा होऊ लागला. इंग्रजी हा विषय घेऊन बी.ए., एम.ए, पीएच.डी. झालो. या गुरुजनांचा उल्लेख करण्याचा हेतू एवढाच की, त्यांच्यामुळेच मला शब्दांचे वेड लागले, त्यांच्याशी खेळण्याची सवय जडली. माझे विचार आणि भावना यांना आकार देण्याचं काम शब्दांनीच केलं आहे. शब्दांचे व ते शिकवलेल्या गुरुजनांचे ऋण न फिटण्यासारखे आहेत आणि तेच बरे आहे.

नव्या पद्धतीने विचार करण्याची माझी सवय जुनीच. भाषेकडे तिरकसपणे पाहण्याचा माझा मार्ग नेहमीच सरळ. भाषेकडे सकसपणे पाहण्याचा माझा दृष्टिकोन नेहमी 'चौरस'च (म्हणजे 'चव-रस').

एकदा मी प्राचार्य असताना अधिव्याख्याता पदासाठी मुलाखती होत्या. एका उमदवाराला मी विचारले, 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' या

विधानातील ‘काळ’ या शब्दाचा अर्थ काय ? तो उमेदवार म्हणाला, ‘काळ’ म्हणजे काळ (Time). मग मी पुन्हा विचारले की, ‘म्हातारी मेल्याचं दु:ख नाही, पण काळ सोकावतो’ या विधानातील ‘काळ’ शब्दाचा अर्थ काय ? तो उमेदवार गप्पच राहिला. मग मीच त्याला सांगितले की, या दोन्ही वाक्यात ‘काळ’ या शब्दाचा अर्थ ‘मृत्यू’ असा आहे. हे असे घडण्याचे कारण म्हणजे कित्येकदा भाषेकडे आपण गांभीर्याने बघत नाही, हे होय.

मला प्रत्येक शब्द आव्हान वाटतो. त्याचे विविध अर्थ मला मोहित करतात, प्रेरित करतात. ते समजल्यानंतर मन आणि बुद्धी समाधान पावतात, अंतरात्मा आनंदाने नाचू लागतो म्हणून शब्दाकडे मी नेहमी कोपरनिकसी किंवा कोलंबसी वृत्तीने पाहत असतो. असे करताना मला शब्दांमागचे विश्व समजते, शब्दांमागील संकल्पना कळते. शब्दांचे संदर्भ व मुळे किती दूरवर आणि खोलवर पसरलेली असतात हे कळते. शब्दांमागील संकल्पना जाणून घेणे म्हणजे अक्षरांतून अस्तित्वाचा अर्थ शोधणे होय. ‘शब्द आणि संकल्पना’ या ग्रंथाची कुळकथा किंवा मूळकथा आहे ती अशी. मला शब्द आवडतात कारण कधी ते ओढ्यासारखे अवखळ वागतात, सरितेसारखे वाहत असतात तर कधी सागरासारखे स्थिर व शांत असतात. ते कधी वादळासारखे अनावर होतात, मेघांसारखा गडगडाट करतात, विजेसारखे कोसळतात आणि पत्थरालाही पाझर फोडतात. प्रत्येक शब्द बिंदू असतो, सिंधू असतो. शब्दाचं सिंधूपण म्हणजेच त्याच्यामागील संकल्पना होय.

‘शब्द आणि संकल्पना’ या ग्रंथातील लेख तीन प्रकारचे आहेत – वैचारिक, समीक्षात्मक व उपयोजित समीक्षात्मक म्हणजेच ग्रंथपरिचयात्मक. ही विभागणी ढोबळ स्वरूपाची आहे कारण प्रत्येक विचार समीक्षात्मक असतो व प्रत्येक समीक्षा वैचारिक असते. प्रश्न आहे तो प्रमाणाचा (कोणाच्या मानाचा नव्हे).

**– डॉ. सहदेव चौगुले**

‘‘म्हणतात, संधी शोधायची नसते; पण आलेली सोडायची नसते आणि आलीच नाही तर निर्माण करायची असते.’’

‘‘गुलाबाचे फूल सुंदर आहे याबद्दल सर्वांचेच एकमत असते. ते किती सुंदर आहे याबद्दल मतभिन्नता असू शकते म्हणून गुलाबाचे सौंदर्य आपल्या ‘वाटण्या-आवडण्या’ वर अवलंबून असते असे नव्हे. आपल्याला वाटते म्हणून गुलाब सुंदर असत नाही, तर गुलाब सुंदर असतो म्हणून तो सुंदर आहे असे आपण म्हणतो.’’

‘‘तत्त्वज्ञान म्हणजे जग आणि जीवनाकडे पाहण्याचा व्यक्तिगत दृष्टिकोन होय. प्रत्येकाचा खास असा जीवनमार्ग असतो, तत्त्वज्ञान असते.’’

‘‘जीवनाकडे पाहण्याचा सूक्ष्म, परिपूर्ण व समीक्षात्मक दृष्टिकोन हाच प्रगल्भ तात्त्विक दृष्टिकोन होऊ शकतो.’’

‘‘एकूण शिक्षण म्हणजे शिकवणं व शिकणं, दुसऱ्याचा आदर आणि कदर करायला शिकवतं ते शिक्षण. प्राप्त ज्ञानाच्या साहाय्याने पुढील ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करणं म्हणजे शिक्षण. ज्ञानाकडून प्रज्ञानाकडे प्रवास करणे म्हणजे शिक्षण, कणभर ज्ञानाचे मनभर व मणभर ज्ञान करणे म्हणजे शिक्षण. कितीही दिले तरी संपत नाही व कितीही घेतले तरी जे संपत नाही ते शिक्षण. अप्राप्याचा, अवघडाचा ध्यास घेऊन कार्यरत राहणे म्हणजे शिक्षण. दुसऱ्याचं ऐकायला शिकणं आणि शिकण्यासाठी ऐकणं, स्वातंत्र्य, खरे स्वावलंबन, सततचा शोध व बोध क्षणाक्षणाला नवीन काही करत राहणं, नवीन काही शिकत राहणं म्हणजे शिक्षण (शिक-क्षण)’’

''स्वातंत्र्य हे असते. ते कशापासून तरी आणि कशासाठी तरी असते. म्हणून ते देण्याचा अथवा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हां, ते काही काळ हिरावून घेतले जाऊ शकते; ते शक्तीने, सक्तीने अथवा सत्तेने मर्यादित केले जाऊ शकते. तरीही मानवी मन नेहमी स्वतंत्रच असते. गुलामगिरीत तर स्वातंत्र्याच्या प्रेरणा जास्त प्रबळ असतात. स्वातंत्र्य हे काही एखादी उपयुक्त वस्तू नसते, तरीही ते आपल्याला हवे असते कारण ते एक मूल्य असते, ती एक संधी असते.''

''अस्तित्ववाद व्यक्तीच्या स्वजाणीवेवर जोर देतो. प्रत्येक व्यक्तीत जगण्याची उत्कट इच्छा असते, प्रत्येकाला आपण एक व्यक्ती म्हणून ओळखले जावे असे तीव्रतेने वाटत असते. असे झाले तरच त्याच्या जीवनाला अर्थ व महत्त्व प्राप्त होते. अस्तित्ववादी तत्त्वज्ञ "to live" आणि "to exist" या दोन क्रियापदांत फरक करतात. त्यांच्या दृष्टीने "to live" म्हणजे कसेबसे जगणे, तर "to exist" म्हणजे अर्थपूर्ण जगणे, एका विशिष्ट जाणीवेने जगणे, परंपरा, रीतीरिवाज यांच्या विरोधी जाऊन जगणे. "to exist" म्हणजे चैतन्यपूर्ण, परिपूर्ण जबाबदार व वृद्धिंगत असे जीवन जगणे होय.''

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | **वैचारिक** | **११** |
| १. | स्वातंत्र्य | १३ |
| २. | ज्ञान -प्रज्ञान | १८ |
| ३. | तत्त्वज्ञान | २२ |
| ४. | अस्तित्ववाद | २७ |
| ५. | मानवतावाद :उगम, उदय आणि विकास | ३२ |
| ६. | शिक्षण : मेंटल अडव्हेंचर | ३७ |
| ७. | विद्रोह | ४१ |
| ८. | मूल्ये | ४६ |
| ९. | प्राध्यापकांचा संप : तात्त्विक, नैतिक पाठबळ | ५१ |
| १०. | शिक्षकांची कार्ये | ५७ |
| ११. | एकविसाव्या शतकामध्ये उच्च शिक्षणाची दिशा नेमकी काय असावी? | ६३ |
| १२. | सॉक्रेटिसी बाणा | ६८ |
| १३. | इयर एंड : तुमचा, आमचा आणि कवींचा | ७३ |
| १४. | एलिएनेशन : तात्त्विक भूमिका | ७८ |
| १५. | भय | ८५ |
| १६. | सुशिक्षितपणा | ८७ |
| १७. | न्याय | ९० |
| १८. | आत्महत्या | ९३ |
| १९. | चिंतन | ९७ |
| २०. | नैतिक जीवन | ९९ |
| २१. | परिचय आणि ओळख | १०३ |

**समीक्षात्मक** ........................................ **१०५**
२२. कला ........................................................ १०७
२३. इतिहास : कला की शास्त्र ? .................................. १११
२४. साहित्य ..................................................... ११५
२५. शोकांतिका ................................................. ११९
२६. शैली......................................................... १२३
२७. काव्यनिर्मिती : कवींची अनुभूती .............................. १२५
२८. कवींचे कवींबद्दल काव्यातून विचार .......................... १३१
२९. समीक्षा आणि समीक्षक ..................................... १३५

**प्रायोजित समीक्षात्मक – ग्रंथ परीक्षण** ................ **१३९**

३०. क्राईम अँड पनिशमेंट : वाट तेजाळणारी 'विजेरी' ............. १४१
३१. शिवाजी द ग्रेट : अर्थात श्रीमानयोगी ........................ १४४
३२. चिनी अक्षर साहित्याचे चांगले भाषांतर ...................... १४७
३३. वारणा खोऱ्याचं यथार्थ व 'आगराळ' दर्शन .................. १५०
३४. पावसाच्या निमित्ताने 'ऋतुनाद'बद्दल ........................ १५३
३५. डॉ. आंबेडकरांचे परिवर्तनशील सामाजिक धोरण ............ १५७
३६. संवेदनशील पत्रकाराने टिपलेली समाज-स्पंदने ............... १६०
३७. सुसंस्कृत राजकीय व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवणारा... ........ १६४
३८. गांधीजी फाळणीविरोधी होते ................................ १६८
३९. अनाथ महिलाश्रमातील जीवनाववर परखड लेखन ............ १७१
४०. बाबांची ओळख करून देणाऱ्या कविता ..................... १७४
४१. राबणाऱ्यांचा विठ्ठल : आनंददायी वाचनानुभव ............... १७६
४२. 'अस्तित्वाचा घनसर स्पर्श' लाभलेल्या अस्तित्ववादी कविता.. १७९

✦✦

# वैचारिक

# स्वातंत्र्य

स्वातंत्र्याबद्दल प्रथम जाणीव निर्माण झाली ती युरोपमधील प्रबोधनाच्या काळात. त्याअगोदर तेराव्या शतकात मॅग्ना कार्टा (१२१५) ने मूलभूत हक्क व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. एखादी संस्था, समाज व सरकार यांच्याकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध झगडत मानवाने आपल्यासाठी काही हक्क व स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले आणि त्याचे पर्यवसान शेवटी व्यक्तिस्वातंत्र्यवादात झाले. जगात झालेल्या क्रांती, बंडे व स्वातंत्र्यलढे यांच्यामुळे स्वातंत्र्य ही संकल्पना जास्त घट्ट बनली आहे. लोकांना स्वातंत्र्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवू लागले. मानव व नागरिकांच्या हक्कांचा फ्रेंच जाहीरनामा (१७८९), अमेरिकन स्वातंत्र्यलढा (१७७६). अमेरिकन बिल ऑफ राईट्स (१७९१) आणि (१९४८) साली युनोने स्वीकारलेले युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्यूमन राईट्स या घटना मानवी स्वातंत्र्याच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. स्वातंत्र्य हा तर लोकशाहीचा आत्मा आहे; पण जिथे हुकूमशाही अथवा साम्यवादी प्रशासन पद्धती आहे तिथेही अलीकडे स्वातंत्र्याची मागणी वाढत आहे. याचे कारण म्हणजे माणूस हा मूलत: आणि जन्मत: स्वतंत्र आणि स्वातंत्र्यप्रिय आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, स्वातंत्र्य हा आपला जन्मसिद्ध , निसर्गसिद्ध व मानवसिद्ध हक्क आहे. इथे हेही मान्य करायला हवे की, माणूस आपल्या नैसर्गिक गरजांसाठी इतर अनेक घटकांवर अवलंबून असतो. तो अनेक मानवनिर्मित बंधनातही अडकून पडलेला असतो. म्हणून फ्रेंच तत्त्वज्ञ रुसोचे म्हणणे पटू लागते : "Man is born free but every where he is in chains". स्वातंत्र्यात बंधन असते आणि बंधनातही स्वातंत्र्य असते हेच खरे. स्वातंत्र्य या संज्ञेला अनेक अर्थ आहेत. स्वातंत्र्य म्हणजे बाह्यबंधनापासून मुक्तता. या अर्थाने आपल्या देशातील कोणतीही व्यक्ती देशात कुठेही केव्हाही

संचार करू शकते. एखादी गोष्ट करण्यासाठी एखादी व्यक्ती स्वतंत्र असण्याअगोदर त्या व्यक्तीला ती गोष्ट करण्यासाठी संधी, सोय असावी लागते. म्हणजे स्वातंत्र्यात संधी अंतर्भूत व अभिप्रेत आहे. एखाद्याला देशात कुठेही संचार करायचा असेल तर त्याच्याजवळ पैसे असले पाहिजेत. याचाच अर्थ असा की, त्याला सरकारने आर्थिक संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे जे नैतिकदृष्ट्या योग्य, बरोबर आहे ते करण्याचे स्वातंत्र्य. म्हणून चुकीच्या गोष्टी करण्याचे अथवा चुकीच्या गोष्टीवर विश्वास ठेवण्याचे स्वातंत्र्य असू शकत नाही.

स्वातंत्र्य हे असते. ते कशापासून तरी आणि कशासाठी तरी असते. म्हणून ते देण्याचा अथवा घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. हा, ते काही काळ हिरावून घेतले जाऊ शकते. ते शक्तीने, सक्तीने अथवा सत्तेने मर्यादित केले जाऊ शकते. तरीही मानवी मन नेहमी स्वतंत्रच असते. गुलामगिरीत तर स्वातंत्र्याच्या प्रेरणा जास्त प्रबळ असतात. स्वातंत्र्य हे काही एखादी उपयुक्त वस्तू नव्हे, तरीही ते आपल्याला हवे असते. कारण ते एक मूल्य असते, ती एक संधी असते.

अस्तित्ववादी तत्त्वज्ञ माणसाचे व्यक्तिगत अस्तित्व व आत्मनिष्ठा यांवर जोर देतात आणि यातून माणसाची व्यक्तिगत जबाबदारी व त्याचे स्वातंत्र्य या गोष्टींवर जोर पडतो. त्यांच्या मते, स्वातंत्र्य हे सिद्ध करायचे नसते. त्याच्याबद्दल वादविवाद किंवा युक्तिवाद करायचा नसतो, तर त्याची अनुभूती घ्यायची असते. स्वातंत्र्य म्हणजे आपल्या मूलभूत स्वभावाच्या मागण्यांचा अर्थ ओळखून, अंदाज घेऊन आपले खरे स्वत्व अभिव्यक्त करणे, त्याचा आविष्कार करणे होय. स्वातंत्र्य म्हणजे आपण केलेल्या निवडींना, निर्णयांना सामोरे जाणे व त्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा स्वीकार करणे होय. सार्त्रच्या मते, माणूस हा स्वत:च्या इच्छेप्रमाणे स्वत:ला घडविण्यास व जीवनमूल्ये निर्माण करण्यास स्वतंत्र असतो. या अर्थाने प्रत्येक गोष्टीस परवानगी असते आणि वस्तुत: माणूस चांगल्या आणि वाईट यांच्या पलीकडे असतो. माणसाचे स्वातंत्र्य त्याला प्रतिष्ठा देते आणि केवळ वस्तू बनण्यापासून त्याला वाचवते.

आपण विविध प्रकारच्या स्वातंत्र्यांबद्दल बोलत असतो. उदाहरणार्थ, राष्ट्रीय स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य, मानसिक स्वातंत्र्य, भावनिक स्वातंत्र्य, आविष्कार स्वातंत्र्य



इत्यादी. आविष्कार स्वातंत्र्यात धार्मिक स्वातंत्र्य, वैचारिक स्वातंत्र्य, भावनिक स्वातंत्र्य, भाषण व मुद्रण स्वातंत्र्य व एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. आविष्कार स्वातंत्र्य व्यापक असल्यामुळे आणि संस्कृतीशी व कलात्मक विकासाशी त्याचा थेट संबंध येत असल्यामुळे ते अत्यंत महत्त्वाचे समजले जाते. ते असल्यामुळेच कला, साहित्य व शास्त्रीय क्षेत्रांत मानव प्रगती करू शकला आहे. ते असल्यामुळेच आपल्या जीवनात नावीन्याला, प्रगत, पुरोगामी विचाराला स्थान असते. मूलगामी व वेगळा विचार शक्य होतो. आविष्कार स्वातंत्र्याचा संकोच होतो तेव्हा जुन्या मताला चिकटून राहणे क्रमप्राप्त ठरते. माणसांची विचार करण्याची क्षमता सुरुवातीला क्षीण व नंतर नाहीशी होते. अशा परिस्थितीत साचलेपण व ऱ्हास जवळ येतात. टीका होत आहे आणि पुढे टीका होईल या भयाने आविष्कार स्वातंत्र्याचा संकोच करणे बरोबर ठरणार नाही. टीकेत (कला) कृतीचे रसग्रहण असते तसे दोषदिग्दर्शनही असते आणि या दोन्हींमुळे आपले जीवन केवळ पुनरावृत्ती होण्यापासून वाचते. त्याच त्या चुका माणसाच्या हातून होत नाहीत. हेन्री स्टील कमेजर म्हणतात, ''टीकाकारांना शिक्षा म्हणजे आपली टीकेपासून फारकत होय आणि अशी फारकत म्हणजे आपण चुका करण्याची शक्यता वाढणे होय. चुका टाळायची आपली इच्छा असेल तर टीकेला उत्तेजन मिळेल असे वातावरण आपण निर्माण केले पाहिजे.''

आविष्कार स्वातंत्र्य लोकशाहीचा पाया असते. मानवी जीवन सर्वांगांनी बहरून येण्यासाठी, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी ते अत्यंत आवश्यक असते. संवाद, वादविवाद व चर्चा (Dialogue, Debate and Discussion) यांच्या प्रक्रियेतून मत बनवणे, निर्णय करणे लोकांना शक्य होते. आविष्कार स्वातंत्र्याच्या अभावामुळे माणसांच्या चांगल्या भावना व चांगली मते 'भूमिगत' होण्याची शक्यता असते. म्हणून शंका विचारण्याचे व ती चुकीची असेल तर दुरुस्त करण्याचे माणसाला स्वातंत्र्य असले पाहिजे.

स्वातंत्र्याचा प्रेमाशी, बुद्धीशी, संस्कृतीशी संबंध येतो. म्हणजेच स्वातंत्र्याचा उपभोग घेणारी व स्वातंत्र्याची मागणी करणारी व्यक्ती मनाने प्रेमळ असली पाहिजे. दुष्ट, निष्ठूर माणूस स्वतंत्र नसलेलाच बरा. स्वातंत्र्याचा सर्वांना चांगला फायदा व्हायचा असेल तर त्याचा योग्य बुद्धीने वापर केला पाहिजे.